MHRG190000182025

:: <u>दिवाणी चौकशी अर्ज क्र.८/२०२५ मधील निशाणी क्रमांक १६ खालील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदारने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे मुळ अर्जात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

०२. अर्ज व सामनेवाला क्र.३ ने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. अर्जदारचे कथन की, अर्जदार यांनी मुदतबंद ठेवीतील रक्कम परत मिळण्याकरिता तपशिलवार अर्ज सादर केलेला आहे. मुळ अर्जातील परि.क्र.१३ मधील विनंती परिच्छेदातील उपकलम 'अ' कडे अर्जदार यांनी जी मागणी केलेली आहे ती मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या पहिल्या अपिलाचे अनुषंगाने न्यायालय मंजुर करु शकत नाही अशी स्थिती निर्माण झाल्यास अर्जदार यांना त्यांच्या कौटुंबिक चरितार्थासाठी किमान सदर मुदतबंद ठेवीवरील बॅकेकडुन दिले जाणारे व्याज हे मासिक/त्रेमासिक पध्दतीने अर्जदार यांना द्यावेत अशी अर्जदार यांची मागणी आहे. तशा आशयाचे आदेश झाल्यास न्यायास धरुन होईल. ज्यामुळे मुदतबंद ठेवीमागील जो उद्देश आहे तोदेखील सफल होईल व अर्जदार यांची चरितार्थाची महिनेमहाची सोयदेखील होईल ज्यामुळे कोणावरही अन्याय होणार नाही. याकारणास्तव, मुळ अर्जातील परि.क्र.१३ मधील विनंती

कलम 'अ' नव्याने 'आ' कलम निर्माण करुन त्यामध्ये 'अर्जदार यांना मुदतबंद ठेवीवर बॅकेकडुन देण्यात येणारे व्याज मासिक/त्रेमासिक पध्दतीने देण्याचे बॅकेस आदेश पारीत व्हावेत' असा मजकुर समाविष्ट करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०४. सामनेवाला क्र.३ यांनी सदर अर्जास तीव्र विरोध केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जदार यांना कोर्टात जमा नुकसान भरपाई रक्कमपैकी ७५ टक्के रक्कम यापुर्वीच अदा केलेली आहे. तरी उर्वरित २५ टक्के रक्कम व त्यावरील व्याज अर्जदार यांना अदा केल्यास सामनेवाला यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपीलाचा उद्देश नष्ट होईल. याकारणास्तव, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०५. उभयपक्षातर्फे करण्यात आलेल्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तावित दुरुस्तीद्वारे अर्जदार हे अर्जात नमुद केल्याप्रमाणे परिच्छेद क्र.१३ मधील विनंती कलम अ नंतर आ असे नवीन कलम समाविष्ट करु इच्छीत आहे. अर्जातील मजकुर व प्रार्थना लक्षात घेता, सदरचा अतिरिक्त मजकुर अर्जदारास प्रस्तावित दुरुस्तीने सामील करण्याची परवानगी दिल्यास सामनेवालाच्या बचावावर कोणताही परिणाम होणार नसल्याचे दिसुन येते. प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ अर्जाच्या स्वरुपात तथा प्रार्थनेमध्ये कोणताही बदल होणार नाही. प्रकरणामध्ये अद्याप उभयपक्षांतर्फे पुरावा नोंदविणे चालु झालेले नाही. परिणामी, प्रकरणाचा टप्पा लक्षात घेता, प्रस्तावित दुरुस्तीला कायदेशीर प्रक्रियेची बाधा येत नाही. प्रस्तावित दुरुस्तीची अर्जदारास परवानगी

दिल्यास सामनेवालाचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारने पुढील तारखेपर्यत मागणीप्रमाणे अर्जात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करण्याचे आदेशित करण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.05.04 12:19:01 +0530

महाड **(श्रीमती एच. आर. जाधव)**

दिनांकः०४.०५.२०२६ दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड